• बीड (महाराष्ट्र) • वर्ष ३ रे • अंक ३५३ • सोमवार,दि. २५ मार्च २०२४ • RNI-MAHMAR/2021/80074 • Post: Reg.No.L/164/RNP/Beed/2022-24 • पान १ • पाने ४ • किंमत ३ रूपये
• Beed (Maharashtra) • Year 3 • Issue 353 • Sunday 25 March 2024 • RNI-MAHMAR/2021/80074 • Post: Reg.No.L/164/RNP/Beed/2022-24 • Page1 • Pages 4 • Price 3




दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज
| बीड | परभणी | संभाजीनगर | जालना | लातूर | धाराशिव | हिंगोली | नांदेड | नगर

# मराठवाडा पत्र

▪ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ▪




बीड • dailymarathwadapatra2021@gmail.com • https://marathwadapatra.com • https://epaper.marathwadapatra.com Mo. 9822152955

# भाजपची लोकसभेसाठी पाचवी यादी



**नागपूर । वृत्तसंस्था**

लोकसभा निवडणूक २०२४ साठी सर्वच पक्षांकडून आपापल्या उमेदवारांची नावे घोषित केले जात आहेत. नुकतीच काँग्रेसने आपली यादी जाहीर केली. यात महाराष्ट्रातल्या एका जागेचा समावेश आहे. त्यानंतर भाजपनेही आपली यादी जाहीर केली आहे. यामध्ये १५ राज्यातील उमेदवारांचा समावेश असून महाराष्ट्रातील ३ नावे जाहीर केली आहेत.

भंडारा-गोंदिया येथून सुनील भेंडे यांना उमेदवारी देण्यात आली आहे. गडचिरोलीमधून अशोक नेते यांना संधी दिली आहे. तर सोलापूरमधून तरुण आमदार राम सातपुते यांना मैदानात उतरवण्याचा निर्णय घेतला आहे. भारतीय जनता पक्षाने लोकसभा निवडणुकीसाठी उमेदवारांची पाचवी यादी जाहीर केली आहे. या यादीत रामायण या मालिकेत रामाची भूमिका साकारणाऱ्या अरुण गोविल यांना मेरठमधून तिकीट देण्यात आले आहे. नवीन जिंदाल यांना कुरुक्षेत्र, हरियाणातून तिकीट देण्यात आले आहे. पिलीभीतमधून वरुण गांधी यांचे तिकीट कापून जितिन प्रसाद यांना उमेदवारी देण्यात आली आहे. काल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील भाजपच्या केंद्रीय निवडणूक समितीच्या बैठकीत दीर्घ विचारमंथनानंतर ही यादी जाहीर करण्यात आली आहे. या बैठकीला भाजप अध्यक्ष जगत प्रकाश नड्डा, गृहमंत्री अमित शहा, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ सिंह यांच्यासह अनेक दिग्गज नेते उपस्थित होते. भाजपने आज जाहीर केलेल्या यादीत १११ उमेदवारांची नावे जाहीर केली आहेत. यामध्ये आंध्र प्रदेशातील ६ आणि बिहारमधील १७ उमेदवारांचा समावेश आहे. भाजपने पाचव्या यादीतील अनेक विद्यमान खासदारांची तिकिटे रद्द करून नव्या चेहऱ्यांना संधी दिली आहे. यामध्ये गाझियाबादचे खासदार व्हीके सिंह यांचे तिकीट कापून अतुल गर्ग यांना संधी देण्यात आली आहे. सुलतानपूरच्या विद्यमान खासदार मनेका गांधी यांना पुन्हा तिकीट देण्यात आले आहे. रामायण या लोकप्रिय मालिकेत रामाची भूमिका साकारणाऱ्या अरुण गोविल यांना मेरठ लोकसभा मतदारसंघातून तिकीट देण्यात आले आहे. सध्या राजेंद्र अग्रवाल येथून खासदार आहेत. सतीश गौतम यांना अलिगड लोकसभा मतदारसंघातून तिकीट देण्यात आले आहे.




## लोकप्रिय आ.नमिता मुंदडांची कार्यक्रमास सदिच्छा भेट

केज – देवगाव येथील सुश्राव्य कीर्तनास लोकप्रिय आ.नमिता मुंदडा यांनी भेट दिली. यावेळी परिसरातील सन्मानीय नागरिक उपस्थित होते.




बीड – शहरातील केलेल्या कामांची पाहणी करताना आ.क्षीरसागरसाहेब.

## दिग्गजांची प्रतिष्ठा पणाला लागणार

नागपूर – लोकसभा निवडणुकांची घोषणा होताच राज्यातील राजकीय वातावरण तापलं आहे. लोकसभा निवडणुकीसाठी मित्र



पक्षांना बाजूला ठेवत भाजपने २० तर काँग्रेस पक्षाने ११ उमेदवारांची घोषणा केली आहे. यामध्ये अनेक दिग्गजांचे तिकीट कापून काही नव्या चेहऱ्यांना संधी देण्यात आली आहे. दोन्ही पक्षांनी आतापर्यंत जाहीर केलेल्या जागांवरुन काँग्रेस आणि भाजपच्या पाच उमेदवारांमध्ये थेट लढत होणार आहे. यामध्ये अनेक दिग्गजांची प्रतिष्ठा पणाला लागली असून या लढती तुल्यबळ होणार एकतर्फी याची चर्चा आता राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे.



## पंकजांना परळीकरांकडून अभूतपुर्व प्रेम

परळी – परळीत गेल्यानंतर स्थानिक कार्यकर्ते व नागरिकांनी अभूतपूर्व प्रेम दिलं.

# नितीन गडकरींचा उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी भाजप करणार शक्तीप्रदर्शन

**नागपूर । वृत्तसंस्था**

आगामी लोकसभा निवडणुकीसाठी भाजपकडून सलग तिसऱ्यांदा केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना नागपुरातनं उमेदवारी मिळाली आहे. नागपूरसह पाच लोकसभा मतदारसंघासाठी उमेदवारी अर्ज दाखल व्हायला बुधवार २० मार्चपासून सुरुवात झाली आहे. असे असताना देशभरात लोकप्रिय असलेले नितीन गडकरी नेमके कधी आपला उमेदवारी अर्ज दाखल करतात याकडे साऱ्यांचे लक्ष लागले होते. अखेर गडकरींना आपला उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठीचा मुहूर्त मिळाला असून येत्या २७ मार्चला नितीन गडकरी आपला उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत. याबाबत स्वत: नितीन गडकरींनी समाज माध्यमांवर माहिती प्रसारित करत या संबंधित माहिती दिली आहे.

केंद्रीय मंत्री आणि विद्यामन खासदार नितीन गडकरी यांनी आपला प्रचाराचा नारळ फोडत स्वत: मैदानात उतरल्याचे बघायला मिळत आहे. 'कहो दिल से, नितीन गडकरी फिर से' म्हणत नागपूर भाजपतर्फे नितीन गडकारींना तिसऱ्यांदा खासदार करण्याचा निर्धार करण्यात आला आहे. त्यात आता नितीन गडकरी यांनी



देखील आपली जोरदार तयारी केल्याचे चित्र आहे. अशातच येत्या २७ मार्चला सकाळी ९ वाजता नितीन गडकरी आपला उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत. या करिता नागपूर भाजप आणि नितीन गडकरींच्या वतीने संविधान चौक से जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत भव्य रॅलीचे आयोजन करण्यात अली असून या रॅलीच्या माध्यमातून नितीन गडकरी आपले शक्तिप्रदर्शन करणार असल्याचे बोलले जात आहे. या करिता स्वत: नितीन गडकारींनी तमाम नागपूरकरांना या रॅलीत सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. एकीकडे खासदार नितीन गडकरी यांच्या विरोधात महाविकास आघाडी तर्फे नेमका कोणता उमेदवार निवडणुकीत उभा राहणार या बाबत अद्याप निश्चिती झालेली नाही. सोबतच गडकारींच्या विरोधात काँग्रेसकडून विकास ठाकरे यांना उमेदवारी मिळाली असल्याचे बोलले जात आहे. मात्र विकास ठाकरे हे स्वतः सुद्धा निवडणूक लढवण्यासाठी फारसे उत्सुक नसल्याचे बघायला मिळत आहे. काँग्रेसच्या जेष्ठ नेत्यांच्या हस्तक्षेपानंतर दिल्ली येथे झालेल्या काँग्रेसच्या वर्किंग कमिटीच्या बैठकीमध्ये नागपूर लोकसभेसाठी आमदार विकास ठाकरे यांच्या नावावर शिक्कामोर्तब झाला आहे. मात्र याची अधिकृत घोषणा होणे बाकी आहे. असे असले तरी विकास ठाकरे नागपूरची निवडणूक लढायला फारसे उत्सुक दिसत नाहीये.

## महायुतीकडून महादेव जानकर यांना एक जागा



मुंबई – महाराष्ट्राच्या राजकारणात ट्विस्ट आलाय. कारण गेल्या काही दिवसांपासून भाजपकडून छोट्या पक्षांना विचारात घेतलं जात नाही, अशी नाराजी दर्शवणारे रासप नेते महादेव जानकर यांनी महायुतीतच राहण्याचा निर्णय घेतला आहे. विशेष म्हणजे महादेव जानकर यांनी काही दिवसांपूर्वी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांची भेट घेतली होती. त्यामुळे महादेव जानकर महाविकास आघाडीकडून लोकसभेची निवडणूक लढतील, अशी चर्चा होती. या सर्व चर्चांनंतर आता राजकारणात ट्विस्ट आणणारी घटना घडली. यांच्या वर्षा या शासकीय निवासस्थानी एक महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीला उपमुख्यमंत्री , उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे उपस्थित होते. तसेच अजित पवार यांच्या गटाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे हे देखील उपस्थित होते. या बैठकीत जागावाटपाबाबत चर्चा झाली. यावेळी महादेव जानकर यांच्या पक्षाला एक जागा सोडण्याचा निर्णय घेण्यात आला. ही बैठक सुरु असताना महादेव जानकर बाहेर आले. यावेळी त्यांनी याबाबतची माहिती दिली. महादेव जानकर हे परभमी लोकसभा मतदारसंघातून निवडणूक लढवण्याची शक्यता आहे.


## प्रणितींना भाजपचं खुलं आव्हान



मुंबई – आगामी लोकसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाकडून आज ५ वी आणि महाराष्ट्रातील उमेदवारांची दुसरी यादी जाहीर करण्यात आली आहे. १११ उमेदवारांच्या यादीत भाजपाने कंगणा रणौतलाही उमेदवारी दिली असून नुकतेच भाजपात प्रवेश केलेल्या उद्योजक नवीन जिंदाल यांनाही हरयाणातून लोकसभेच्या रिंगणात उतरवले आहे. दुसरीकडे महाराष्ट्रातील ३ लोकसभा मतदारसंघातील उमेदवारांच्या नावाची घोषणा करण्यात आली आहे. त्यामध्ये, सोलापुरातून आमदार राम सातपुते यांना उमेदवारी देत नवा चेहरा मैदानात उतरवण्यात आला आहे. खासदार जय सिद्धेश्वर यांचं तिकीट कापण्यात आलं आहे. भाजपाने यापूर्वी महाराष्ट्रातील २० उमेदवारांच्या नावांची घोषणा केली होती. त्यानंतर, आता तीन लोकसभा मतदारसंघातील उमेदवार घोषित केले आहेत. त्यामध्ये, सोलापुरातून आमदार सातपुते, भंडारा-गोंदियातून बाबूराव मेंढे आणि गडचिरोलीतून अशोक महादेवराव नेते यांना उमेदवारी देण्यात आली आहे. त्यामुळे, माजी केंद्रीय गृहमंत्र्यांचा मतदारसंघ असलेल्या सोलापुरात आमदार प्रणिती े विरुद्ध सातपुते अशी तरुण लढत पाहायला मिळणार आहे.

## मोदींनी मला तिकिट दिलं-पंकजा मुंडे

बीड – भाजप नेत्या पंकजा मुंडे यांना बीडमधून लोकसभेची उमेदवारी जाहीर झाली



आहे. भाजपचं तिकीट मिळाल्यानंतर पंकजा मुंडे पहिल्यांदाच परळी शहरात दाखल झाल्या. यानंतर परळीकरांनी पंकजा मुंडेंचं मोठ्या उत्साहात स्वागत केलं. शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात जेसीबीच्या माध्यमातून फुलांची उधळण करत पंकजा मुंडेंचं स्वागत केलं गेलं. यानंतर पंकजा मुंडेंनी छत्रपती शिवरायांना अभिवादन केलं, तिथून त्या निवासस्थानी दाखल झाल्या आणि त्यांची बहीण प्रीतम मुंडे यांनी त्यांचं औक्षण करून स्वागत केलं. पंकजा मुंडे यांनी धनंजय मुंडे यांची त्यांच्या घरी जाऊन भेटही घेतली. आमच्या भाजपमध्ये एक पद्धत आहे, राज्याची टीम वेगळी आणि केंद्राची टीम वेगळी. माझं भाग्य आहे की स्वत: पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मला उमेदवारी जाहीर केली आहे.

## संपादकीय

चौकातील सिग्नल सुरू असला तरी तो बिनदिक्कतपणे तोडणे, ट्रेन वा कचरा बाहेर टाकणे, ज्येष्ठ नागरिक वा महिलांसाठी राखीव असलेल्या सीटवर बसणे, अशा एक ना अनेक गोष्टी आपण दररोज करतो.

# शाळेत नेमकं शिकवितात काय?




त्याचे कारण म्हणजे याबाबतच्या मूलभूत गोष्टींची शिकवण आपल्याकडे दिली जात नाही, परंतु जपानमध्ये हे चित्र उलट आहे. तेथे प्राथमिक शाळांमध्ये मूल्यशिक्षणाला अधिक प्राधान्य दिले जाते. परिणामी जपानी नागरिक हे त्यांच्या कार्यक्षमता आणि नम्रतेसाठी जगभर ओळखले जातात. आयुष्यात काहीतरी मोठं होण्यासाठी शिक्षणाशिवाय पर्याय नाही, हे आपण अनेकदा ऐकतो. परंतु एखाद्-दुसरी पदवी घेऊन गलेलठ्ठ पगाराची नोकरी मिळवायची, हाच आपल्याकडील शिक्षणाचा सर्वसामान्य हेतू. त्यादृष्टीनेच अगदी प्राथमिक शाळेपासून ते उच्च शिक्षणापर्यंत धडे दिले जातात. परंतु हुशार विद्यार्थी होण्यापेक्षा जबाबदार नागरिक व्हावा, यासाठी आपल्याकडील शाळांमध्ये फारसे प्रयत्न केले जात नसल्याचे दिसते. कारण अभ्यासक्रमाचाच भाग असलेल्या मूल्यशिक्षण, कार्यानुभाव, शारीरिक शिक्षण, यासारख्या विषयांकडे लक्षच दिले जात नाही. अनेक शाळांमध्ये तर या विषयांच्या तासिकांना नियमित विषयांचे तास घेऊन अभ्यासक्रम पूर्ण करण्यावरच दिला जातो. मग प्रश्न पडतो, की अभ्यासक्रमांमध्ये हे विषय का दिले असावेत? त्याचं सरळसोपं उत्तर आहे की पारंपरिक शिक्षणासोबतच विद्यार्थ्याला 'माणूस' म्हणून घडविणे. एकीकडे भारतीय शिक्षण पद्धतीत हे चित्र असताना, जपानमध्ये मात्र फार वेगळे चित्र पाहायला मिळते. तेथील शिक्षण व्यवस्थाच विद्यार्थ्यांना 'माणूस' म्हणून घडविण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे दिसते. चौथ्या वर्गापर्यंत विद्यार्थ्यांच्या परीक्षाच घेतल्या जात नाहीत. कारण जपानी लोकांचा विश्वास आहे की, या वयात पारंपरिक शिक्षणापेक्षा विद्यार्थ्यांना स्वतःची कामे स्वतः कशी करावी, सार्वजनिक ठिकाणी कसे वावरावे, लोकांशी विनम्रतेने कसे बोलावे, एकमेकांना मदत कशी करावी, टीमवर्कने काम कसे करावे, वेळेच भान कसे जपावे, हे जास्त महत्त्वाचे आहे. परीक्षेचा वा अभ्यासाचा ताण नसल्याने आपसूकच विद्यार्थ्यांची शाळेतील उपस्थिती १०० टक्के असते. यातूनच विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास होत देशाचा उत्तम नागरिक म्हणून त्यांना घडविले जाते. जपानी शिक्षण पद्धतीचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे शालेय वयापासूनच विद्यार्थ्यांना आनंदी जीवनाचे धडे दिले जातात. आयुष्यात किती व्यस्त असा, कितीही आव्हाने वा दडपण आले, तरी त्याबाबत सकारात्मक विचार करण्याचे शिकविले जाते. त्यामुळे जपानी लोक कित्येक तास आनंदाने काम करताना दिसतात. शाळेतील पहिली तीन वर्षे विद्यार्थ्याला अभ्यासापेक्षा चांगल्या सवयी, व्यक्तिमत्त्व विकासाचे धडे दिले जातात. इतरांविषयी आदर, विनम्रता, सहानुभूती बाळगण्याचेही शिकविले जाते. जपानमधील अनेक शाळांमध्ये सफाई कर्मचारी नसतोच. विद्यार्थीच आपापले वर्ग, कॅन्टीन, स्वच्छतागृह स्वच्छ करतात. या सवयींमुळे त्यांच्यात स्वच्छतेचे महत्त्व रुजवले जाते. विद्यार्थ्यांचे योग्य पद्धतीने भरणपोषण व्हावे, म्हणून त्यांना शिक्षकांसोबत शाळेतच पोषक व सकस आहार दिला जातो. प्रत्येक विद्यार्थ्याच्या आरोग्याकडे लक्ष दिले जाते. शालेय शिक्षण संपले, तरी पुढील शिक्षणाच्या हेतूने तसेच विविध विषयांच्या मार्गदर्शनासाठी शाळांमध्ये वेगवेगळ्या वर्कशॉप्सचे नियमित आयोजन केले जाते. सतत सक्रिय राहा : तुमच्याकडे फावला वेळ असला, तरी त्यात शक्य तो स्वतःला कोणत्या तरी कामात गुंतवून ठेवा. अगदी केर काढण्यापासून ते एखादे चित्र काढणे आदी कामे करू शकता. स्वतःसाठी जगा : कायम दगदगीचे आणि धावपळीचे आयुष्य दीर्घायुष्याला घातक आहे. स्वतःला समृद्ध आयुष्य जगण्यासाठी वेळ द्या. चांगला मित्रपरिवार : उत्तम आयुष्यासाठी मित्रपरिवार चांगला असावा, यावर जपानी लोक भर देतात. तेथील शाळेत दिले जाणारे टीमवर्कचे धडे चांगले मित्र तयार करण्यासाठी उपयोगी पडतात. निसर्गाशी जोडून घ्या : आनंदी आणि दीर्घायुष्यासाठी निसर्गाच्या अधिक सानिध्यात राहण्यावर भर द्या. त्यासाठी जपानमध्ये पर्यावरणाचे बाळकडू शाळेतच दिले जाते. कृतज्ञता बाळगा : तुम्हाला जे काही आज मिळतेय आणि ज्यांच्यामुळे मिळतेय, त्यासाठी त्यांच्याप्रति कृतज्ञता बाळगा. विनम्रता हा जपानी लोकांच्या आयुष्याचा सर्वांत मोठा गुण आहे.

## काही तरी गडबड आहे!



कोणती तरी संस्था जगातील सर्वात आनंदी देश कोणते आहेत, याचा दरवर्षी शोध घेत असते. यावर्षी १४३ देशांच्या यादीमध्ये आनंदी देश असण्यामध्ये आपल्या देशाचा १२६ वा क्रमांक आहे. सर्वप्रथम स्पष्ट करू इच्छितो की, आम्हास हा निष्कर्ष मान्य नाही. सर्वात आनंदी देशांची यादी पाहिली तर काय दिसून येते, त्याचा आधी आढावा घेऊया. क्रमवारीनुसार फिनलँड, डेन्मार्क, आईसलँड, स्वीडन, इस्रायल, नेदरलँडस्, नॉर्वे, स्वित्झर्लंड ऑस्ट्रेलिया अशी यादी आहे. सर्वात दुःखी देशांत अफगाणिस्तान, लेबनान, काँगो, झिंबाब्वे व अन्य देश आहेत. शेजारी देशांवर नजर टाकली तर इजिप्त १२७, श्रीलंका १२८, बांगलादेश १३० व टांझानिया १३१ या स्थानांवर आहेत.

फिनलँडने सलग सातव्यांदा जगातील सर्वात आनंदी देशांच्या यादीत पहिले स्थान मिळवले आहे व अफगाणिस्तान शेवटच्या स्थानावर आहे. या अहवालानुसार सर्वात जास्त आनंदी देश युरोप खंडात आहेत. आधी म्हटल्याप्रमाणे हा अहवाल आम्हाला अजिबात मान्य नाही. जो फिनलँड हा देश प्रथम क्रमांकावर आहे, त्याची लोकसंख्याच मुळात ५५ लाख आहे. ५५ लाख एकसाथ आनंदी राहण्याची शक्यता जास्त आहे. त्या तुलनेत आपल्या देशाची लोकसंख्या सव्वाशे कोटीच्या आसपास आहे. याचा अर्थ कुठे तरी गफलत होत आहे.

हा अहवाल तयार करण्यासाठी मुख्यत्वे काही निकष वापरले आहेत. हे निकष कोणते? प्रत्येकाचे उत्पन्न, सामाजिक स्वातंत्र्य, आरोग्य, भ्रष्टाचार, सामाजिक स्थिती अशा प्रकारचे आहेत. सामाजिक स्वातंत्र्याचा विषय घेतला तर भारताइतके सामाजिक स्वातंत्र्य कुठेही नाही, हे लक्षात येईल. त्यातल्या त्यात आनंदाची बातमी म्हणजे आपल्या देशातील वृद्ध हे जास्त आनंदी आहेत, असाही निष्कर्ष या अहवालात नोंदवला आहे. याचे कारण अजूनही बर्यापैकी टिकून असलेली एकत्र कुटुंब संस्था आणि मुलेबाळे घेत असलेली म्हातार्यांची काळजी हे असावे, अशी शक्यता आहे. असे काही निकष लावण्यापेक्षा सदरील संस्थेने अस्सल भारतीयत्वाचे निरीक्षण केले असते, तर भारत जगातील पहिल्या दहा क्रमांकांमधील आनंदी देश राहिला असता. आपला काही संबंध नसताना राजकारणावर तावातावाने चर्चा करणारे लोक आनंदी नाहीत का? रोज टीव्हीवर येऊन वाटेल ते बडबड करणारे राजकीय नेते आनंदी नाहीत का? लाखोंच्या संख्येने शेकडो किलोमीटर पायी चालत जाऊन विठूनामाच्या गजरात तल्लीन झालेले आमचे वारकरी आनंदी नाहीत का? महाराज, बुवा यांची अखंड कीर्तने ऐकणारे आमचे लोक आणि विशेषत: महिला आनंदी नाहीत का? खेड्यापाड्यातून हरिनाम सप्ताहाला गर्दी करणारे आणि परमेश्वरचरणी लीन होणारे भाविक आनंदी नाहीत का? असे प्रश्न पडतात. त्यामुळे या संस्थेचे निकष लावताना कुठे तरी काही तरी चुकते आहे, हे निश्चित. श्रीमंत लोकांपेक्षा मोलमजुरी करणारे श्रमिक जास्त आनंदी आहेत, असेही या अहवालात नोंदवलेले आहे. साहजिकच आहे. अगदी बांधकामावर भरउन्हात काम करणारे मजूरही एकमेकांची खिल्ली उडवत हसत खेळत काम करत असतात. त्याच वेळेला श्रीमंत लोक मख्ख चेहरे करून आजूबाजूच्या लोकांपेक्षा आपण कसे वेगळे आहोत, हे दाखवण्याच्या दुःखात असतात.

# चला, होळीत अश्लीलतेचे दहन करूया




**नागपूर । वृत्तसंस्था**

देशभरात होळी हा सण साजरा केला जातोय. होळीचा सण दरवर्षी वाईटावर चांगल्याचा विजय म्हणून साजरा केला जातो. याच होळी सणाच्या पार्श्वभूमीवर अमरावतीतील मोझरी येथील युवती संवादच्या कार्यक्रमात महिला भगिनींनी केंद्र आणि राज्य सरकारच्या अन्यायकारी धोरणांची होळी केली आहे.

लोकसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर देशभरात प्रचारांच्या तोफा धडधडत असताना केंद्र सरकारच्या आणि राज्य सरकारच्या चुकीच्या धोरणामुळे त्रस्त झालेल्या सर्वसामान्यांच्या मनातील भावना काँग्रेसच्या युवतीनी व्यक्त केल्या आहेत. यावेळी महिलांनी होळीमध्ये सर्व अनिष्ट गोष्टी जाळून येणाऱ्या निवडणुकीत पुरोगामी विचारांच्या, संविधान रक्षणासाठी सतत जागृत असलेल्या महाविकास आघाडीच्या उमेदवारांना निवडून देण्याचा संकल्प केलाय. देशभरात लोकसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राजकीय पक्षाकडून प्रचारांची रणधुमाळी सुरू आहे. असे असताना केंद्र सरकार आणि राज्य सरकारच्या चुकीच्या धोरणामुळे वाढती महागाई, गॅस सिलेंडर पेट्रोल, डिझेलच्या वाढलेल्या किंमती आणि संविधानाची मोडतोड करण्याचा सुरू असलेला प्रयत्न हा अन्यायकारी असल्याचे सांगत या विरोधात काँग्रेसच्या महिलांनी अन्यायकारी धोरणांची होळी जाळत आपला रोष व्यक्त केला आहे. युवती संवादच्या वतीने आयोजित या कार्यक्रमात मोठ्या संख्येने युवती आणि महिला उपस्थित होत्या.

## राजकुमारीला कॅन्सर झालाय!

वेल्सच्या राजकुमारी केट मिडलटन यांना कॅन्सर झाल्याचे निदान झाले आहे. त्यांच्यावर तत्काळ केमोथेरपी सुरू करण्यात आली आहे. केट यांनी शनिवारी ही माहिती दिली. जानेवारी २०२४ मध्ये केट यांच्या पोटावर शस्त्रक्रिया करण्यात आली होती.



त्या दोन आठवडे हॉस्पिटलमध्ये होत्या. तेव्हापासून त्या सार्वजनिक ठिकाणी दिसल्या नव्हत्या. त्यामुळे त्यांच्या प्रकृतीबाबत अनेक प्रश्न उपस्थित केले जात होते. परंतु शनिवारी त्यांनी स्वतः पॅन्सर झाल्याची माहिती दिली. काही चाचण्या झाल्या त्यात कर्करोग झाल्याचे उघड झाले, परंतु मी ठीक आहे. वैद्यकीय पथकाच्या सल्ल्यानुसार मी केमोथेरपी घेत आहे. माझ्यासाठी आणि विल्यमसाठी ही धक्कादायक बातमी होती, असे केट यांनी म्हटले आहे. दोन महिन्यांपूर्वी राजा चार्ल्स यांनाही कर्करोग झाल्याची बातमी समोर आली होती. जानेवारीमध्ये त्यांच्यावर प्रोस्टेटची शस्त्रक्रिया झाली होती. त्या वेळी त्यांच्या शरीरात आणखी काही आजारांची लक्षणे दिसू लागली होती. यानंतर त्या लक्षणांच्या तपासणीत कर्करोगाच्या प्रकाराची पुष्टी झाली आहे, असे बकिंघहॅम पॅलेसने सांगितले होते. कॅन्सर कोणत्या स्टेजला आहे, याची माहिती दिली नाही.

# तंत्रज्ञानाचा वाढता वापर महिलांसाठी फायद्याचा?



**मुंबई । वृत्तसंस्था**

कॉम्प्युटर म्हणजे संगणकीय पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी १० हजार ३७२ कोटी रुपयांचा कृत्रिम बुद्धिमत्ता किंवा कार्यक्रम लॉन्च केला आहे. त्याचबरोबर वेगवेगळ्या उद्योग व्यावसायिकांना त्यांच्या डेटा सेंटरचे रूपांतर कॉम्प्युटर युनिट्समध्ये करण्यासाठी वेगवेगळी प्रोत्साहने दिली जाणार आहेत. अर्थात, यामुळे जगाचे कृत्रिम बुद्धिमत्ता केंद्र किंवा फॅक्टरी होण्याचे लक्ष्य गाठता येईल, असे मत 'नविदिया'चे दक्षिण आशियाचे व्यवस्थापकीय संचालक विशाल धुपार यांनी व्यक्त केले आहे. कॉम्प्युटर युनिट्समुळे बुद्धिमत्तेची निर्मिती होते. पूर्वीच्या काळात एका बाजूला पाणी असे आणि दुसर्या बाजूला वीज निर्माण केली जात असे. कारखाने उभारले जात असत. आता एकीकडे माहिती किंवा डेटा असेल आणि दुसर्या बाजूला त्यामधून बुद्धिमत्तेची निर्मिती होईल. शिवाय भारतात मुळातच बुद्धिमानांची संख्या मोठी आहे. देशात या क्षेत्रात सार्वजनिक आणि खासगी कंपनीची भागीदारी केली जात आहे.

आता मोठ्या प्रमाणात माहितीचे संकलन करणे, आकडेवारीचे गणन-विश्लेषण करणे, तिचा अन्वयार्थ लावणे याची आवश्यकता निर्माण झाली आहे. शेकडो सेंटर प्रोसेसिंग युनिट्सवर (सीपीयू) जगावर अधिराज्य गाजवू शकतात. इमेज आणि व्हिडिओ प्रोसेसिंगसाठी जनरेटिव्ह एआय प्लॅटफॉर्म्सना प्रशिक्षित करण्याची गरज आहे. आज जगभरात संशोधनात भारताचा वाटा दोन टक्केदेखील नाही. उलट चीन आणि अमेरिकेचा तो अनुक्रमे ५८ टक्के व ५९ टक्के इतका आहे. भारताच्या सकल राष्ट्रीय उत्पादनाच्या तुलनेत संशोधनावरील आपला खर्च एक टक्कादेखील नाही. तर अमेरिका, चीनचा तो साडेचार टक्के इतका आहे. हा खर्च हे देश मुख्यतः संशोधनविषयक पायाभूत सुविधांवर करतात. म्हणून भारताने या देशांपासून शिकण्यासारखे आहे. गेल्या वर्षी एआयच्या जागतिक भागीदारी संघटनेचा भारत हा अध्यक्ष होता. एआयच्या तंत्रज्ञानात जो श्रेष्ठ असेल, तो जगावर राज्य करील, असे काही वर्षांपूर्वी रशियाचे अध्यक्ष पुतीन म्हणाले होते. भारताने सार्वजनिक सेवा, संरक्षण, आरोग्य, शिक्षण, वित्त अशा अनेक क्षेत्रांत एआय तंत्रज्ञानाचा वापर केला आहे. एआयचा वापर आणि त्या क्षेत्रात काम करणारे कुशल कर्मचारी या बाबतीत भारताने बरीच प्रगती केली आहे. पुढील वर्षापर्यंत भारताच्या जीडीपीमध्ये एआयच्या माध्यमातून ५०० अब्ज डॉलरची भर टाकली जाईल, असा अंदाज आहे; परंतु या नव्या प्रवाहात भारताच्या आयटी क्षेत्रातील नोकर्या कमी होतील का, अशीही भीती व्यक्त केली जात आहे. दोन वर्षांपूर्वी 'ओपन एआय' या कंपनीने 'चॅट जीपीटी' या लोकप्रिय संवादप्रणालीला बाजारात आणले. भविष्यात नवनवे तंत्रज्ञान विकसित होऊन ते बाजारात येणारच आहे. त्यामुळे त्याबाबत मागे राहून चालणार नाही. नीती आयोगाने २०१८ मध्ये भारताचे कृत्रिम बुद्धिमत्तेसंबंधीचे राष्ट्रीय धोरण जाहीर केले. परंतु आता या क्षेत्रात झालेली प्रगती पाहता, ते धोरण मागे पडले असून, नवे धोरण ठरवणे आवश्यक बनले आहे. त्यासाठी देशपातळीवरील एक शिखर संस्था स्थापन करण्याची गरज आहे. अमेरिकेत अध्यक्षपदाच्या निवडणुकीचा प्रचार सुरू झाला असून, यावेळी लाखो मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी एआयचा उपयोग केला जात आहे. एआयच्या माध्यमातून तयार केलेल्या गोष्टी मतदारांच्या छोट्या छोट्या गटांना त्यांच्या प्रोफाइलनुसार पाठवल्या जातील. हे व्हिडिओ तयार करणारे जनरेटिव्ह आर्टिफिशियल इंटेलिजन्स, चॅट जीपीटी आज सर्वज्ञात आहे. इंटरनेटवरून सर्व माहिती शोधून, त्यावर ब्लॉग लिहिणे, गाणी व कविता रचणे हे सर्व त्यामुळे शक्य होते. हायर ग्राउंड्स लॅबसारख्या जागतिक कंपन्या निवडणूक प्रचारात वापरण्यात येणार्या तंत्रज्ञानामध्ये गुंतवणूक करत आहेत. या लॅबच्या सहसंस्थापक बेटसी हूवर यांनी २००७ मध्ये माजी राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा यांच्या निवडणूक प्रचार आयोजक म्हणून काम केले होते. ओबामांनी डिजिटल तंत्रज्ञानाचा पुरेपूर वापर केला होता. यापूर्वी निवडणुकीचे मेसेज ईमेल आणि फेसबुकच्या माध्यमातून पाठवले जात होते. परंतु आता एआयचा वापर करून मतदारांचे प्रोफाइल आणि प्राधान्य शोधता येते. त्यानुसार उमेदवार आपल्या प्रचारतंत्रात बदल करू शकतो. हे तंत्रज्ञान मतदारांच्या प्रोफाइल आणि विचारांवर आधारित निवडणूक प्रचार साहित्याची निर्मिती करू शकते. उमेदवारांच्या निवडणूक प्रचारासाठी मोठ्या प्रमाणावर कंटेंट रायटर व रणनीतिकारांची नियुक्ती केली जाते. हे लोक प्रत्येक पोस्टमध्ये वेगळेपण तयार करून, अलग अलग मतदारांपर्यंत संदेश पोहोचवतात. यामुळे हे काम अधिक नेमके जलद व स्वस्तात होते. एआय तंत्रज्ञान इतके विकसित झाले आहे की, आता कोणाच्याही आवाजाची हुबेहूब नक्कल करता येते. मात्र, याचा गैरवापरही होऊ शकतो. मागच्या दोन दशकांत कॉम्प्युटर आणि सॉफ्टवेअर बनवण्याची आपली क्षमता वेगाने वाढली आहे. तसेच सामान्य माणूस फोटो, व्हिडिओ, आवाज या स्वरूपातील बरीचशी माहिती समाजमाध्यमात टाकत असतो. आता मशीन तुमचा आवाज, चेहरा ओळखते आणि तुमच्या कुटुंबीयांची माहितीही त्यांच्याकडे असते. जनरेटिव्ह एआयच्या मदतीने एखाद्याचे टेक्स्ट मेसेज, फोटो, व्हिडिओ आणि ऑडिओ वापरून बनावट कंटेंट बनवणे देखील सोपे झाले आहे. आता व्हॉइस क्लोनिंगदेखील होऊ लागले आहे. 'चॅट जीपीटी' हे कृत्रिम बुद्धिमत्तेचे एक सॉफ्टवेअर आहे.

## महत्त्वाचे

### तिसरी ते सहावी इयत्तेसाठी नवा अभ्यासक्रम



नागपूर - १ एप्रिलपासून सुरू होणाऱ्या शैक्षणिक वर्ष २०२४-२५ साठी राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद (एनसीईआरटी) तिसरी ते सहावी इयत्तेसाठी नवीन अभ्यासक्रम व पाठ्यपुस्तके प्रकाशित करणार आहे. इतर वर्गांच्या अभ्यासक्रमात आणि पाठ्यपुस्तकांमध्ये कोणताही बदल होणार नाही, असे सीबीएसईच्या अधिकाऱ्यांनी सांगितले. केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाने (सीबीईएसई) संलग्न शाळांना पाठविलेल्या पत्रात म्हटले आहे की, एनसीईआरटीने त्यांना कळविले आहे की, इयत्ता तिसरी ते सहावीच्या नवीन अभ्यासक्रम आणि पाठ्यपुस्तकांवर काम केले जात आहे. लवकरच ते प्रकाशित केले जातील. सीबीएसईचे संचालक (शैक्षणिक) जोसेफ इमॅन्युएल म्हणाले की, तिसरी ते सहावीसाठी ही नवी पुस्तके असतील. एनसीईआरटीकडून साहित्य प्राप्त झाल्यानंतर ते सर्व शाळांना ऑनलाइन पाठविले जाईल.

### प्रणितींना भाजपचे आव्हान?



मुंबई - लोकसभा मतदार संघातून आमदार प्रणिती शिंदेंना काँग्रेसकडून उमेदवारी जाहीर झालीय. त्यांच्याविरोधात भाजपकडून अनेकजण इच्छुक आहेत. पण पक्षाकडून अजूनही कुणाचं नाव जाहीर करण्यात आलं नाहीये. प्रणिती शिंदे यांना आधी भाजपची ऑफर असल्याच्या चर्चाही सुरू झाल्या होत्या. पण त्यांनी त्या सगळ्या चर्चांना बाजूला ठेवून गेल्या काही दिवसांपासून मतदार संघाचे दौरे, गावभेटी आणि कॉर्नर बैठका घेत प्रचार सुरू केला होता. प्रणिती यांनी सोलापूर मध्य विधानसभा मतदारसंघातून सलग तीन वेळा विजय मिळवलेला आहे. वडील केंद्रात मंत्री असताना प्रणिती शिंदेंनी 'जाई-जुई' या संस्थेच्या माध्यमातून सामाजिक क्षेत्रात काम सुरू केलं. २००९ साली प्रणिती शिंदे यांच्या राजकीय कारकिर्दीला सुरुवात झाली. त्यांनी काँग्रेसच्या तिकिटावर सोलापूर मध्य इथून विधानसभा निवडणूक लढवली होती. २०१४मध्ये भाजपची लाट असताना विधानसभा निवडणुकीत दुसऱ्यांदा विजय मिळवला, तर २०१९ मध्ये प्रणिती शिंदेनी आमदारकीची हॅटट्रिक केली. सध्या प्रणिती या राष्ट्रीय काँग्रेस कार्यसमितीच्या सदस्य आहेत. तसंच महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे कार्याध्यक्ष पद त्यांच्याकडे आहे. आता २०२४मध्ये काँग्रेसने प्रणिती शिंदेना पहिल्यांदा लोकसभेच्या रिंगणात उतरवण्याचा निर्णय घेतला आहे.

### सेशनसाठी बसण्याची सक्ती -प्रियंका चतुर्वेदी



नवी दिल्ली - भाजपचे उत्तर मुंबईतील उमेदवार पियुष गोयल यांचे पुत्र ध्रुव गोयल यांच्या कांदिवलीतील ठाकुर कॉलेजमधील एका कार्यक्रमामुळे वाद निर्माण झाला आहे. पीयूष गोयल यांच्या मुलाच्या भाषणाला जबरदस्तीने बसवलं गेल्याचा आरोप विद्यार्थ्यांनी केला. कॉलेज प्रशासनानं विद्यार्थ्यांची आयकार्ड जप्त करून त्यांना या सेशनसाठी बसण्याची सक्ती केल्याचाही विद्यार्थ्यांचा आरोप होता. तर याच प्रकरणावरून शिवसेना ठाकरे गटाच्या खासदार प्रियंका चतुर्वेदी यांनी कॉलेजच्या प्राचार्यांना जाब विचारला. ध्रुव गोयल यांच्या कार्यक्रमाला उपस्थित विद्यार्थ्यांनी आपल्याला जबरदस्तीने बसवलं जात असल्याचा आणि आयकार्ड जप्त केल्याचा आरोप केल्याचा व्हायरल होतोय. त्यानंतर शिवसेना ठाकरे गटाच्या खासदार प्रियंका चतुर्वेदी यांनी केला होता. त्यावर या व्हिडीओत फेरफार करुन अवास्तव वाद निर्माण करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप करत ठाकूर कॉलेज प्रशासनानं स्पष्टीकरण दिलं. कॉलेजच्या या स्पष्टीकरणावर प्रियंका चतुर्वेदींनी प्राचार्यांना खडेबोल सुनावले.

# शिक्षण हक्क कायद्या अंतर्गत शाळांची नोंदणी

**पुणे । वृत्तसंस्था**

बालकांच्या मोफत व सक्तिच्या शिक्षण हक्क कायद्याअंतर्गत २५ टक्के राखीव जागावरील प्रवेश प्रक्रिया राबविण्यासाठी राज्यातील ७४ हजार ६७८ शाळांनी नोंदणी केली असून ९ लाख ५५ हजार ३६३ एवढ्या जागाही उपलब्ध झालेल्या आहेत.




दुर्बल घटकातील घटकातील बालकांना मोफत प्रवेश व शिक्षण देण्यात येत असते. यातून नामांकित शाळांमध्ये प्रवेश मिळविण्यासाठी पालकांमध्ये स्पर्धा लागलली असते. त्यामुळे पालकांकडुन अर्जनोंदणीलाही चांगला प्रतिसाद मिळत असतो. सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षाच्या प्रवेशासाठी शाळा नोंदणी प्रक्रिया ६ मार्चपासून सुरु झालेली आहे. १८ मार्च पर्यंत ही मुदत देण्यात आली होती. त्यानंतर २२ मार्चपर्यंत मुदतवाढही देण्यात आली होती. आरटीई कायद्यात बदल करण्यात आल्यामुळे प्रवेश प्रक्रियेसाठी शाळांची संख्याही वाढली आहे. पुणे जिल्ह्यातील ४ हजार ९५६ शाळांनी नोंदणी केलेली त्यात ७२ हजार ९३४ जागा दर्शविण्यात आलेल्या आहेत. बालकांचे प्रवेश अर्ज भरण्याबाबतची प्रक्रिया अद्याप सुरु झालेली नाही. त्याबाबतचे वेळापत्रकही जाहीर झालेले नाही. प्राथमिक शिक्षण प्रवेशाचे वेळापत्रक लवकर जाहीर करुन त्याची अंमलबजावणीही सुरु करावी, अशी मागणी पालकांकडून करण्यात येवु लागलेली आहे. त्यातच राज्य शासनाने प्रवेश प्रक्रिया राबविलेल्या शाळांची शुल्क प्रतिपुर्तीची रक्कम थकित ठेवली आहे. प्रक्रिया राबविण्याबाबत नुरुत्साह दाखविण्यास सुरुवात केलेली आहे.

## मुलीवर लैंगिक अत्याचार करून दिले वाऱ्यावर सोडून

**नागपूर । वृत्तसंस्था**

सोशल मीडियाची क्रेझ तरुणांप्रमाणे किशोरवयीन मुलांमध्ये मोठ्या प्रमाणावर आली आहे. अभ्यासाकडे लक्ष देण्याऐवजी या वयात तासांनतास मुले सोशल मीडियावर घालवत असतात. या सोशल मीडियातून अनोखे प्रेम प्रकरण समोर आले आहे.




भेटण्यासाठी अल्पवयीन मुलगी नेपाळहून भारतात सीमा ओलांडून दाखल झाली. आभासी जगातला मित्र आपला प्रियकर होईल, अशी स्वप्न घेऊन आलेल्या या अल्पवयीन मुलीला मात्र एका वेगळ्याच संकटाला तोंड द्यावं लागले. ज्या प्रियकराने भेटण्यासाठी नेपाळहून बोलावलं होते, त्याला फक्त तिच्या शरीराचा उपभोग घ्यायचा होता, हे त्या अल्पवयीन मुलीला माहीत नव्हते. त्याने लैंगिक अत्याचार केल्यानंतर त्या मुलीला वाऱ्यावर सोडून दिले. एका १५ वर्षीय मुलीची मुंबईतील मुंब्रा येथील एका मुलाशी ओळख झाली.

## लातूरमध्ये यंदा वारं कुणाचं?

**लातूर । प्रतिनिधी**

लोकसभा मतदारसंघ अनुसूचित जातींसाठी राखीव मतदारसंघ आहे. यंदा भाजपकडून खासदार सुधाकर शृंगारे आणि काँग्रेसकडून डॉ. शिवाजी काळगे रिंगणात आहेत. अन्य पक्षांकडून लवकरच उमेदवार जाहीर होतील. स्थानिक उमेदवारांमुळे निवडणुकीची चुरस वाढणार असे चित्र आहे.

लातूर लोकसभा मतदारसंघ अनुसूचित जातींसाठी राखीव मतदारसंघ आहे. गेल्या तीन निवडणुकांपासून हा मतदारसंघ राखीव झाला असून, एक वेळा काँग्रेसने, तर दोन वेळा भारतीय जनता पक्षाने विजय मिळवला आहे. यंदा भाजपकडून खासदार सुधाकर शृंगारे आणि काँग्रेसकडून डॉ. शिवाजी काळगे रिंगणात आहेत. अन्य पक्षांकडून लवकरच उमेदवार जाहीर होतील. तूर्तास तरी स्थानिक उमेदवारांमुळे निवडणुकीची चुरस वाढणार असे चित्र आहे. लातूर लोकसभा मतदारसंघात लातूर शहर, लातूर ग्रामीण, उदगीर, अहमदपूर, निलंगा व लोहा हे सहा विधानसभा मतदारसंघ येतात. त्यापैकी लातूर शहर व ग्रामीण काँग्रेस, लोहा अपक्ष, निलंगा भाजप, अहमदपूर व उदगीरमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार आहेत. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शिवराज पाटील चाकूरकर यांचे या मतदारसंघावर २००४ पर्यंत वर्चस्व होते. सन २००४ मध्ये भाजपच्या रूपाताई पाटील निलंगेकर यांनी शिवराज पाटील चाकूरकर यांचा ३०,८९१ मतांनी पराभव केला. त्यानंतरच्या निवडणुकीत काँग्रेसने कोल्हापूरचे जयवंतराव आवळे यांना लातुरातून उमेदवारी देण्यात आली आणि त्यांच्या विजयाची जबाबदारी तत्कालीन मुख्यमंत्री दिवंगत विलासराव देशमुख यांच्यावर होती.




आवळे यांनी भाजपचे सुनील गायकवाड यांचा पराभव केला. अगदी कमी मताधिक्याने गायकवाड पराभूत झाले होते. सन २०१४ मध्ये डॉ. सुनील गायकवाड यांना भाजपने पुन्हा निवडणुकीच्या रिंगणात उतरवले. त्यांनी काँग्रेसचे उमेदवार दत्तात्रय बनसोडे यांचा दोन लाख २३ हजार ३९५ मतांनी पराभव केला. २०१९ च्या निवडणुकीत भाजपने उमेदवार बदलला. तत्कालीन जिल्हा परिषद सदस्य, उद्योजक सुधाकर शृंगारे यांना उमेदवारी दिली. काँग्रेसनेही उद्योजक असलेल्या आणि राष्ट्रवादी काँग्रेसमधून काँग्रेसमध्ये आलेले मच्छिंद्र कामत यांना उमेदवारी दिली. मोदी लाटेमुळे शृंगारे यांनी काँग्रेस उमेदवार कामत यांचा दोन लाख ८९,०११ मतांनी पराभव केला. निवडणुकीत भाजपला ५६.५४ टक्के मते मिळाली. वंचित बहुजन आघाडीच्या राम गारकर यांना एक लाख १२ हजार २५५ मते मिळाली होती. लातुरात रेल्वे कोच फॅक्टरी उभी राहिली. प्रत्यक्षात लोकांना मिळणारा अपेक्षित रोजगार, पूरक उद्योग सुरू होण्याचे स्वप्न, त्यातून मिळणारा रोजगार हा या वेळच्या निवडणुकीचा कळीचा मुद्दा असणार आहे.

## नवीन संच मान्यतेचे निकष रद्द करा -शिक्षक-शिक्षिका कमिटी

**बीड । प्रतिनिधी**


राज्याच्या शालेय शिक्षण विभागाच्या वतीने प्राथमिक व माध्यमिक शाळांमधील शिक्षकांचे संच मान्यता करताना सुधारित निकष नुकतेच जाहीर करण्यात आले आहेत. यामुळे राज्यातील हजारो शिक्षक अतिरिक्त होणार असून विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता पूर्ण शिक्षणावर गंभीर परिणाम होण्याची भीती व्यक्त करण्यात आली या पार्श्वभूमीवर शासन निर्णय तात्काळ रद्द करण्यात यावा.बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षण अधिकार अधिनियम २००९ तील मूळ तरतुदीप्रमाणे संच मान्यता करण्यात यावी अशी मागणी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीने प्राथमिक शिक्षणाधिकारी यांच्यामार्फत शालेय प्रधान सचिव यांना निवेदनाद्वारे केली आहे.



शालेय शिक्षण विभागाने १५ मार्च रोजी शासन निर्णय पारित करून सन २०२४-२५ साठी संच मान्यतेचे सुधारित निकषास मान्यता दिली आहे हे निकष देशाच्या शिक्षण हक्क कायद्यातील तरतुदींचा भंग करणारे आहेत. राज्यातील २० पेक्षा कमी पट असलेल्या वाडी, वस्ती,तांडे व दुर्गम तसेच आदिवासी बहुल क्षेत्रातील प्राथमिक वर्गाकरिता एकच शिक्षक मिळणार आहे. तसेच दहा पटाच्या आतील शाळेला सेवानिवृत्त शिक्षक नेमण्याचे धोरण शासनाने राबवले आहे. एकीकडे राज्यात हजारो डी.एड. पात्रता धारक विद्यार्थी नोकरीच्या प्रतीक्षेत असताना सेवानिवृत्त शिक्षकांना नेमणूक देऊन शासन तरुण शिक्षकांना रोजगारापासून वंचित ठेवण्याचे पाप करीत असल्याचा आरोप संघटनेने केला आहे. तसेच एका शिक्षकास २ ते ३ वर्गाचे अध्यापन करावे लागणार आहे. त्यामुळेग्रामीण व आदिवासी भागातील शाळेत शिकवणाऱ्या बालकांना शिकविण्यास पुरेसे शिक्षक उपलब्ध होणार नाहीत.त्यामुळे त्याचा विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर परिणाम होणार आहे.

पटसंख्या १३५ पेक्षा कमी झाल्यास मुख्याध्यापकाचे पद राहणार नाही.त्यामुळे राज्यातील अनेक शाळा मुख्याध्यापकाविना असणार आहेत. त्याचा शाळेच्या व्यवस्थापनावर परिणाम होऊन शिक्षकांना पदोन्नतीच्या संधी उपलब्ध होणार नाहीत. हे निकष नैसर्गिक न्यायास धरून नसल्याचे प्राथमिक शिक्षक समितीची धारणा आहे नवीन निकष रद्द करून शिक्षण हक्क कायद्यातील मूळ तरतुदीप्रमाणे संच मान्यतेचे निकष कायम ठेवावे अशी मागणी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती च्या वतीने करण्यात आली आहे.

### पाण्यात बुडून मृत्यू



नागपूर - मागील दोन दिवसापासून बेपत्ता असलेल्या दोन सख्ख्या भावंडांचा पाण्यात बुडून मृत्यू झाला. ही धक्कादायक घटना शनिवारी सायंकाळी ६.३० वाजताच्या सुमारास उघडकीस आली. सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, शहरातील वडगाव परिसरातील अल्पवयीन दिवसांपासून बेपत्ता होते. त्या दोघांचा कुटुंबीयांनी सर्वत्र शोध घेतला. मात्र ते कुठेही आढळून आले नाही. अखेर त्या मुलांच्या आईने अवधूतवाडी पोलिस ठाण्यात मुले हरवल्याची तक्रार दाखल केली. घटनेचे गांभीर्य लक्षात घेता अवधूतवाडी पोलिस ठाण्यातील अधिकारी, कर्मचाऱ्यांनी दोन्ही मुलांचा शोध सुरू केला. अशात शनिवारी सायंकाळी आर्णी मार्गावरील एलिमेंट मॉलच्या बाजूला असलेल्या रेल्वे पुलाखालील पाण्यात त्या दोन्ही भावंडांचे मृतदेह तरंगताना नागरिकांना आढळून आले. माहिती मिळताच अवधूतवाडी ठाणेदार नरेश रणधीर यांच्यासह पोलिस अधिकारी, कर्मचारी यांनी त्या ठिकाणी धाव घेतली. दरम्यान नागरिकांच्या मदतीने पोलिसांनी त्या दोन्ही भावंडाचे मृतदेह पाण्याबाहेर काढले. दरम्यान घटनास्थळाचा पंचनामा करून दोन्ही मृतदेह उत्तरीय तपासणी करता जिल्हा शासकीय रुग्णालयात पाठविण्यात आले. या प्रकरणाचा पुढील तपास नरेश रणधीर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस करीत आहे.

## लोकसभा निवडणुकीत नव्या उमेदवारांनी घेतली प्रचारात आघाडी

**नागपूर । वृत्तसंस्था**

लोकसभा निवडणुकीसाठी भाजपने आपल्या २० उमेदवारांची यादी जाहीर केली आहे. यामध्ये भाजपने विद्यमान ४ खासदारांना डच्चू दिला आहे. तर १६ विद्यमान खासदारांना भाजपने पुन्हा उमेदवारी दिली आहे.

मात्र निवडणुक तोडांवर आली असता भाजपच्या विद्यमान खासदार सुस्त झाले आहे. तर नव्या उमेदवारांनी प्रचारात मोठी आघाडी घेतली आहे. यामध्ये दिंडोरी लोकसभेच्या खासदार भारती पवार यांचा पहिला क्रमांक असल्याचे दिसून येत आहे. बीडच्या खासदार प्रितम मुंडे यांचं तिकीट कट करून पंकजा मुंडे यांना उमेदवारी जाहीर केली. काल पंकजा मुंडे यांनी पुणे-नगर असा दौरा करत बीड जिल्ह्यात प्रचाराला सुरूवात केली. तर दुसऱ्या बाजूला चंद्रपुर लोकसभेतून सुधीर मुनगंटीवार यांनी देखील प्रचारात मोठी आघाडी घेतली आहे. यातच पुणे लोकसभा मतदारसंघात माजी महापौर मुरलीधर मोहोळ यांनी तर नेत्यांच्या गाठीभेटी सुरू केल्या प्रचारासाठी तसेच निवडणुकीसाठी मोठी यंत्रणा उभी केली आहे. तिकडे नागपुरमध्ये नितीन गडकरी आज आपल्या प्रचाराच्या कार्यालयाचं उद्घाटन करणार आहेत. प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची देखील उपस्थिती राहणार आहे. तर सांगलीत संजय काका पाटील यांनी देखील निवडणुकीसाठी कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांना कामाला लावून दिले आहेत. तर दुसऱ्या बाजूला विद्यमान खासदार असलेल्या भारती पवार सध्या



प्रचारात सुस्त असल्याचे दिसून येत आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे स्वत: सोशल मीडियावर ॲक्टीव राहतात. मात्र विद्यमान खासदार आपल्या गुर्मीत असल्याचं दिसून येत आहे. भारती पवार यांच्यासह नंदुरबारच्या खासदार हिना गावित, तसेच जळगावच्या उमेदवार स्मिता वाघ, माढ्याचे खासदार रणजित सिंह निंबाळकर, अहमदनगरचे विद्यमान खासदार सुजय विखे पाटील सध्या सोशल मीडियापासून लांब दिसून येत आहेत. विद्यमान खासदार आपल्याच गुर्मीत असून त्यांनी अद्याप प्रचाराचा नारळही फोडलेला दिसून येत नसल्याचे समजत आहे. दरम्यान, राज्यात प्रथमच महायुती विरूद्ध महाविकास आघाडी असा सामाना रंगणार आहे. राज्यात झालेले पक्ष फुट प्रकरण याचा फटका कदाचित भाजपलाही बसण्याची शक्यता आहे. तर महाविकास आघाडीकडील उमेदवारांनी प्रत्येक मतदारसंघात मोठी तयारी केल्याचे दिसून येत आहे. मात्र भाजपचे उमेदवारांची तयारी अजूनही दिसून येत नसल्याचे चित्र सध्या उमटत आहे.

## महत्त्वाचे

### तरुणाची गळफास घेऊन आत्महत्या



बीड- अनिल  शिंदे या २२ वर्षाच्या तरुणाने बेरोजगारीला कंटाळून डिघोळअंबा शिवारात आंब्याच्या झाडास गळफास घेत आत्महत्या केल्याची घटना शनिवारी (दि.२३) सकाळी ९.३० वाजता निदर्शनास आली. होळ येथील अनिल  शिंदे (वय २२) याचे १२ वी पास व आयटीआयचे शिक्षण झाले होते. तो बेरोजगार असल्याने त्याने शेवटी बेरोजगारीला कंटाळून २२ मार्च रोजी रात्री १० वाजता घरातून बाहेर पडत  (ता. अंबाजोगाई) शिवारातील गणपत श्रीरंग गुंडरे यांच्या शेतातील आंब्याच्या झाडास दोरीने गळफास घेत आत्महत्या केली. या घटनेची माहिती मिळताच युसुफवडगाव ठाण्याचे सहाय्यक फौजदार रमेश सिरसाट, जमादार संपत शेंडगे यांनी घटनास्थळी भेट देऊन मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी पाठवून दिला. ज्ञानेश्वर शेषराव शिंदे यांच्या खबरेवरून युसुफवडगाव पोलिसात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. पुढील तपास जमादार संपत शेंडगे हे करीत आहेत.

### सुट्टीच्या दिवशीही जिल्ह्यातील सबरजिट्रर कार्यालय सुरू राहणार

बीड -बीड जिल्ह्यातील सब रजिस्ट्रार कार्यालय सुट्टीच्या दिवशीही सुरू राहणार आहे. अशी माहिती सहाय्यक जिल्हा निबंधक मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालय यांच्याकडून देण्यात आली आहे.  वार्षिक बाजार मूल्य दरतक्ते १ एप्रिल २०२४ रोजी प्रसिद्ध होत असल्याने सबरजिस्ट्रार कार्यालयात मार्च महिन्यात खरेदी खत, साठे खत, इसार पावती, गहाण खत, इत्यादी सर्व प्रकारचे दस्तऐवज नोंदणीसाठी पक्षकारांची गर्दी होत असते. तसेच विविध सणांच्या मुहूर्तावर सुद्धा घर खरेदीकारांचा कल असतो. महाराष्ट्र शुल्क सवलत अभय योजना २०२३ चा दुसरा टप्पा सुरू असून बर्याच पक्षकारांना आर्थिक वर्षात व्यवहार पुर्ण करायचे असल्याने जनतेच्या सुविधेसाठी दि. २३-३-२०२४ (शनिवार), २४-३-२०२४ (रविवार) आणि दि. २९-३-२०२४ (शुक्रवार गुड फ्रायडे), ३०-३-२०२४ (शनिवार), ३१ -३-२०२४ (रविवार या सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी बीड जिल्ह्यातील सर्व सब रजिस्ट्रार कार्यालये नियमित सुरू राहणार असून या दिवशी दस्त नोंदणी करणे व मुद्रांक शुल्क सवलत योजनेअंतर्गत अर्ज दाखल करण्याची सुविधा मिळणार असल्याचे मुद्रांक जिल्हाधिकारी अशोक आटोळे यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्जहटले आहे.

### जन्म मृत्यु प्रमाणपत्रासाठी जिल्हा रुग्णालयाने कर्मचारी वाढवला



बीड -जिल्हा रुग्णालयातून जन्म मृत्यु प्रमाणपत्र दिले जाते. हे प्रमाणपत्र देण्यासाठी एकच कर्मचारी नियुक्त करण्यात आला होता. त्यामुळे सबंधीतांना लवकर प्रमाणपत्र मिळत नव्हते. या बाबत रिपोर्टरने वृत्त प्रकाशीत केले होते. याची दखल प्रशासनाने घेवून एक कर्मचारी नियुक्त केला आहे. या कर्मचार्यामुळे दररोज ४० ते ५० जणांना प्रमाणपत्र मिळू लागले. प्रमाणपत्र देण्यासाठी टोकन पध्दतीचा अवलंब केला जावू लागला.जिल्हा रुग्णालयामध्ये जन्म मृत्यु प्रमाणपत्र काढण्यासाठी दररोज अनेक नागरीकांची गर्दी असते. या विभागामध्ये पुर्वी एकच कर्मचारी होता. एका कर्मचार्याला इतका भार झेपत नव्हता. या बाबत रिपोर्टरने वृत्त प्रकाशीत केले होते. याची दखल रुग्णालय प्रशासनाने घेवून आणखी एका कर्मचार्याची नियुक्ती केली. आता या विभागात दोन कर्मचारी झाले असून दररोज ४० ते ५० जणांना जन्म मृत्युचे प्रमाणपत्र मिळू लागले. वेळेवर प्रमाणपत्र मिळण्यासाठी टोकण पध्दतीचा अवलंब करण्यात येत आहे.




# जुगाऱ्यांकडे बीड पोलिसांचे अर्थपूर्ण दुर्लक्ष ?

**बीड। प्रतिनिधी**



पोलीस अधिक्षक यांनी अवैध धंद्यांविरोधात कारवाईची मोहीम अधिक गतिमान करण्यासाठी विशेष पथक स्थापन केले होते.याची जबाबदारी सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश मुंडे यांच्यावर सोपविण्यात आली होती.गणेश मुंडेंनी पथकाच्या कार्यकाळात फरार ३५ आरोपी पकडले,५ जुगार अड्ड्यावर छापा मारून ३८ जणांना ताब्यात घेत ८ लाखांचा मुद्देमाल जप्त केला.दारूच्या ४ कारवाया करत ८ आरोपी ताब्यात घेऊन ३ लाख ३३ हजार ६०० रुपयांचा ऐवज जप्त केला.याशिवाय ४ हजार ब्रास वाळू ताब्यात घेऊन २३ वाहने व मुद्देमाल असा ५ कोटींपेक्षा अधिकचा माल ताब्यात घेतला होता.गणेश मुंडेंनी आपल्या कारवायांमुळे माफ़ियामध्ये भीतीचे वातावरण निर्माण केले होते.मात्र नंतर पथक बरखास्त केल्यानंतर स्थानिक गुन्हे शाखेत कार्यरत असलेल्या मुंडे यांनी मागच्या आठ दिवसांत जुगार अड्ड्यावर परळीत ३,नेकनूरमध्ये २,माजलगावमध्ये ३,सिरसाळामध्ये १ कारवाया करत आपली मोहीम सुरूच ठेवली असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

मुंडे यांनी पथक प्रमुख म्हणून काम करताना अनेक चर्चेत राहणाऱ्या कारवाया केल्या.यात विशेष करून माफियांविरोधातील कारवाया महत्वाच्या ठरल्या होत्या.मात्र नंतर पोलीस अधीक्षक यांनी पथक बरखास्त करून गणेश मुंडेंना आपल्या मूळ जागी म्हणजेच स्थानिक गुन्हे शाखेचे दुय्यम अधिकारी म्हणून कर्तव्यास पाठविले.सध्या त्यांचे पथक जिल्ह्यात अवैध धंद्यांविरोधात कारवाई करण्यासाठी पुन्हा सक्रिय झाल्याचे पाहायला मिळत आहे.मागच्या आठ दिवसांत मुंडे यांच्या पथकाने जुगाऱ्यांवर परळीत ३,नेकनूरमध्ये २,माजलगावमध्ये ३,सिरसाळामध्ये १ कारवाई करून अवैध धंद्यांविरोधात दंड थोपटल्याचे पाहायला मिळत आहे.

## प्रेम प्रकरणातून मुलीची हत्या ?

**बीड । प्रतिनिधी**

येथून जवळच असलेल्या घोसापुरी येथे काल रात्री (दि.२३) ११ च्या सुमारास एका अल्पवयीन मुलीची हत्या करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.ग्रामीण पोलिसांना घटनेची माहिती मिळाल्यानंतर घोसपुरीत जाऊन पंचनामा करण्यात आला.तर आज (दि.२४) सकाळी ११ च्या सुमारास मयत मुलीच्या मृतदेहाचे शवविच्छेदन जिल्हा रुग्णालयात करण्यात  आले.हत्याप्रकरणातील मुख्य आरोपी फरार झाला असून त्याचे वडील वैजनाथ माणिक गायकवाड व अन्य एकाला पोलिसांनी ताब्यात घेतल्याचे कळते. सदर प्रकरणात सुरुवातीला सामूहिक अत्याचाराच्या वावड्या उठविण्यात आल्या मात्र,हा प्रकार प्रेम प्रकरणातून घडला असल्याची माहिती पोलीस निरीक्षक   बंटेवाड बोलताना दिली. भगवानसोबत लग्न नको म्हणून नातेवाईकांचा प्रचंड विरोध होता.यातूनच भगवानने टोकाचे पाऊल उचलत आत्याच्या मुलीची हत्या केली. ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

# बीड-नगर राज्य महामार्गावर भीषण अपघातात जागीच ठार

**बीड । प्रतिनिधी**



कडा येथील काम आवरून संकुडवाडी कडे निघालेल्या दुचाकीचालकाला एकाने लिफ्ट मागितली. मात्र काही अंतरावर जाताच बीड-नगर राज्य महामार्गावरील डोईठाण येथील शिवनेरी चौकात टँकरच्या धडकेत दोघांचाही जागीच मृत्यू झाला. हा अपघात दुपारी चार वाजता झाला असून मृत दोघांची नावे अद्याप समजू शकली नाहीत. पाटोदा तालुक्यातील संकुडवाडी येथील दुचाकी चालक रविवारी सायंकाळी चार वाजेच्या दरम्यान दुचाकीवरून धामणगांव मार्ग गावाकडे जात होता. धामणगाव येथे रोडवर उभा असलेल्या एकाने लिफ्ट मागितल्याने त्याला घेऊन तो पुढे निघाला. मात्र काही अंतरावर जाताच बीड नगर राज्य महामार्गावरील डोईठाण परिसरातील शिवनेरी चौकात बीडहून अहमदनगरच्या दिशेने जात असलेल्या टँकरसोबत ( क्रमांक एम.एच १६, सी.सी.७६३१) दुचाकीची जोराची धडक झाली. यात दुचाकीवरील दोघांचा जागीच मृत्यू झाला. अपघात घडताच टँकर चालक पसार झाला होता. कडा पोलिसांनी पाठलाग करत चालकाला टँकरसह ताब्यात घेतले आहे.

# वडवणीत बालक, नागरीकांमध्ये गालफुगी आजाराची साथ

**वडवणी । प्रतिनिधी**

वडवणी शहर व परिसरात मागील काही दिवसांपासून संसर्गजन्य आजाराच्या साथी पसरण्यास सुरुवात झाली असुन सध्या एक ते पंधरा वर्षे वयोगटातील बालकांमध्ये व नागरीकांमध्ये गालफुगी अर्थात गलगंड या आजाराचे प्रमाण वाढले आहे. लाळ ग्रंथीवर सूज येऊन हा आजार होत असल्यामुळे बालकांना व नागरीकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.



या आजारावर वेळेत व तातडीने उपचार घेण्याची गरज असल्याचे आरोग्य विभागाने स्पष्ट केले आहे. स्वच्छतेच्या अभावामुळे वडवणी शहर व परिसरात मागील काही दिवसात बदलत्या वातावरणात संसर्गजन्य आजार पसरत आहेत. डासांचा प्रादुर्भाव वाढत आहे. डेंग्यूचे व गोचीड तापाचे देखील काही रुग्ण आढळण्यास आता सुरुवात झाली आहे. त्यातच मागील काही दिवसात शालेय विद्यार्थी व बालकांमध्ये एक ते पंधरा वर्षे वयोगटात गालफुगी या आजाराचे रुग्ण दररोज वाढताना आढळत आहेत. हा आजार संसर्गजन्य असून शाळेत बालक सातत्याने एकमेकांच्या जवळ व संपर्कात असल्याने हा आजार मोठ्या प्रमाणात पसरला आहे. मम्पस हे एक व्हायरल संक्रमण आहे. ज्यामुळे लाळ ग्रंथि सुजतात, हे सामान्यतः बालवयाच्या दरम्यान होते. आरोग्य विभागाच्या म्हणण्यानुसार मम्मस हा आजार पॅरामीझोवायसर या विषाणूमुळे होतो. वडवणी तालुक्यात मोठ्या प्रमाणात बालकांना व नागरीकांना आजाराचा संसर्ग झाला असून सध्या लाळ ग्रंथि सुजणे, ज्यामुळे चेहऱ्यावर, गळ्यावर, गालावर सूज ताप, अशक्तपणा आणि अंगदुखी ही लक्षणे दिसत आहेत. हवेतून ड्रॉपलेट किंवा खोकल्याद्वारे व लाळेद्वारे आजार पसरतो.  आजाराच्या प्रतिबंधासाठी नियमित लसीकरण करून घेणे, आजारी व्यक्तींचा संपर्क टाळणे हेच उपाय असून लक्षणे दिसल्यास ताबडतोब डॉक्टरांना दाखवणे व उपचार घेणे गरजेचे असल्याचे वडवणी तालुका आरोग्य विभागाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. दरम्यान, शहर व परिसरात डासांची उत्पत्ती रोखण्यासाठी नगर पंचायत प्रशासनाने नियमित धूर फवारणी करण्याची गरज आहे. तसेच आरोग्य विभागाकडूनही पाणी नमुने तपासणी करणे गरजेचे आहे. नागरिकांकडूनही अशी मागणी होत आहे.

## पंकजा मुंडेंना ग्रामीण भागात होतोयं विरोध

**बीड । प्रतिनिधी**

भाजप नेत्या पंकजा मुंडे यांना काळे झेंडे दाखविले. हा प्रकार बीड तालुक्यातील  शनिवारी सकाळी घडला. याप्रकरणी बीड ग्रामीण ठाण्यात पाच आंदोलकांविरोधात गुन्हा दाखल झाला आहे. बीड लोकसभा निवडणूकीची उमेदवारी जाहिर झाल्यानंतर भाजप नेत्या पंकजा मुंडे शुक्रवारी जिल्ह्यात आल्या. शनिवारी सकाळी त्या नारायणगाडवर दर्शनासाठी गेल्या. परत बीडला येताना साक्षाळपिंपरी येथील मराठा आंदोलकानी त्यांच्या गाडीला काळे झेंडे दाखविले. पोलिसांनी त्यांना बाजूला केले.   आंदोलक आक्रमक झालेले पाहून त्यांचा ताफा सरळ बीडला निघून आला. त्यानंतर पोलिसांनी जिल्हाधिकाऱ्यांच्या जमावबंदी आदेशाचे उल्लंघण, आचारसंहिता असतानाही विनापरवानगी आंदोलन केल्याने पोलिसांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल केला. या सर्वांवर कडक कारवाई केली जाणार असल्याचे पोलिस निरीक्षक बंटेवाड यांनी सांगितले.



# ग्रामीण भागात होळीचे महत्त्व ?

होळीच्या दुसऱ्या दिवशीच रंग खेळायला सुरुवात झाली आहे. परंतु तुम्हाला माहिती आहे का की, होळी, धुळवड आणि धूलिवंदन यात नेमका काय फरक आहे? उत्तर भारतीय परंपरा नकळतपणे मराठी माणसांनी स्वीकारल्याने पूर्वापार चालत आलेली खरी रंगपंचमी. जाणून घेऊया होळी, धुळवड आणि रंगपंचमी यांचे वास्तविक महत्त्व आहे.

पंचांगानुसार, यंदा २४ मार्च रोजी होळी तर २५ मार्च २०२४ रोजी धूलिवंदन साजरी होत आहे. हिंदू धर्मात होळी सणाला खूप महत्त्व तसेच मोठे आकर्षण देखील आहे. लहानग्यापासून ते ज्येष्ठांपर्यंत सर्वच जण या उत्सवाच्या रंगात रंगतात. त्यानुसार, होळी उत्सवातील धूलिवंदनाच्या दिवशी उधळण्यात येणाऱ्या रंगांचे काय महत्त्व आहे आणि कोणता रंग कोणाला लावला पाहिजे जाणून घेऊया भारतीय संस्कृती विविधतेने नटलेली आहे. सण-उत्सवांचा देश म्हणून भारताची ओळख आहे. यातील महत्त्वाच्या सणांमध्ये होळीचा समावेश होतो. होळी हा भारतातील तसेच हिंदू धर्मातील महत्त्वाचा सण आहे. धूलिवंदनाच्या दिवशी विविध रंगांची उधळण केली जाते. पण सर्वात जास्त ज्या



रंगाची उधळण होते, तो म्हणजे लाल रंग. लाल रंगाचे आपले एक वेगळेच महत्त्व आहे. लाल रंग हा शौर्य, धैर्य, उर्जा, उत्साह महत्वाकांक्षा आदीचे प्रतीक मानले जाते. देवीच्या पूजेमध्ये लाल रंगाला खूप महत्त्व असून देवीला लाल रंगाच्या वस्तू अर्पण केल्या जातात. हा प्रेमाचा देखील रंग मानला जातो. मात्र धूलिवंदनाच्या दिवशी वापरला जाणारा लाल रंग उत्साह आणि उर्जेचे प्रतीक मानला जातो. त्यामुळे धूलिवंदनाच्या दिवशी लहान मुले व तरुणांनी लाल रंग वापरावा. तसेच त्याना हा रंग लावावा. पिवळा रंग तुम्ही तुमच्या बहिणींना किंवा घरातील महिलांना लावू शकता. होळीच्या दिवशी मोठ्या प्रमाणावर वापरला जाणारा हा रंग सौंदर्य, पूजा आणि आदराचे प्रतीक आहे. चेहऱ्यावर पिवळा रंग आकर्षक दिसतो. हिंदू धर्मात पिवळ्या रंगाला विशेष महत्त्व असून बऱ्याचदा पूजेत पिवळ्या रंगाची फुले, वस्त्र वापरली जातात.  समृद्धी, सुसंवाद, प्रगती, भरभराट, स्थिरता, संतुलन, सहनशक्ती, सौंदय आणि चैतन्याचे प्रतीक आहे. हिरवा रंग हा निसर्गाची हिरवळ आणि सौंदर्य वाढवणारा मानला जातो. सकारात्मकतेचे प्रतीक असलेला हा रंग तणाव देखील दूर करतो. हा रंग नशीब आणि समृद्धीचा सूचक देखील मानला जातो. होळीच्या सणाला तुम्ही तुमच्या पेक्षा मोठ्यांना तसेच ज्येष्ठांना हिरवा रंग लावू शकता. सुखाच्या रंगांनी आपले जीवन रंगीबेरंगी होवो,  होळीच्या ज्वाळेत वाईटाचा समूळ नायनाट होवो ! होळी आणि धुलिवंदनाच्या हार्दिक शुभेच्छा तुमच्यावर प्रेम, आनंद आणि उल्हासाचा होवो वर्षाव आयुष्यात  येणाऱ्या सर्व तेजस्वी रंगछटांसाठी सदिच्छा.. तुम्हाला **दै. मराठवाडा पत्राच्या वतीने धुलिवंदनाच्या सर्वांना मनःपूर्वक हार्दिक हार्दिक शुभेच्छा...!!**

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed, Beed -431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq-Beed Dist-Beed pin -431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि.बीड, -४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता.जि.बीड -४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com,Eportal-https://marathwadapatra.com